लागवड केलेल्या दोन एकर क्षेत्रावर १५०० साड्यांचा वापर करून शेडनेटची उभारणी केली आहे. त्यामु
जालना) येथे उन्हापासून बचाव होण्यासाठी पपईवर टाकलेले आच्छादन. (छायाचित्र : विशाल अस्वार)

# कृषिमूल्य आयोग हवा स्वायत्त आणि सक्षम

## कर्नाटक कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश यांचे मत

संतोष मुंढे

औरंगाबाद : केंद्रीय व राज्यस्तरीय कृषिमूल्य आयोग स्वायत्त व सक्षम बनविल्याशिवाय शेतकऱ्यांना कृषिमालाला अपेक्षित आधारभूत किंमत व त्यांच्या शेतीविषयक प्रश्नांची कायमस्वरूपी सोडवणूक होणे शक्य नसल्याचे मत कर्नाटकच्या कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. टी. एन. प्रकाश कामार्डी यांनी 'अॅग्रोवन'शी बोलताना व्यक्त केले.

डॉ. प्रकाश म्हणाले, शेतीमालाला परवडणारे दर मिळण्याच्या कामाला प्राथमिकता देण्यासोबतच शेतकऱ्यांसाठीच्या कल्याणकारी योजना, उत्पादन खर्च कमी कसा करता येईल, शेतमालाचे विमा संरक्षण, ई-टेंडरिंग आणून व्यापाऱ्यांमध्ये स्पर्धा वाढविणे, शेतकऱ्यांसाठीच्या यंत्र व तंत्राचा प्रसार करण्यावर काम केले गेले. राज्यातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन केंद्रीय कृषिमूल्य आयोगाकडे २५ प्रमुख पिकांच्या आधारभूत किमती किती असाव्यात व त्या का असाव्यात याचा अभ्यासपूर्ण अहवाल शास्त्रज्ञांसह तज्ज्ञांच्या अनुभवातून सादर केला गेला. त्यामध्ये अशाप्रकारे किमान आधारभूत किमत शिफारशीत करताना शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे उणे राहते याचाही लेखाजोखा मांडला गेला. शासनाला त्याने कोणता माल किती खरेदी करावा, केव्हा खरेदी करावा, कोणत्या किमतीने खरेदी करावा याविषयी विधायक सूचना केली गेली. त्यामुळे वेळीच दक्ष झालेल्या कर्नाटक सरकारने केंद्राच्या हमीदरापेक्षा ४५० रुपये अधिकचा दर देऊन राज्यात तुरीची खरेदी केली.

राज्य कृषिमूल्य आयोगाच्या कार्याचेच फलित म्हणून केंद्राच्या आधारभूत किमतीपेक्षा जादा दर नाचणीला सर्वाधिक २१०० रुपये प्रतिक्विंटलचा दर देणारे कर्नाटक एकमेव राज्य ठरले. महाराष्ट्रात एक रुपये किलोने कांदा विकला जात असताना कर्नाटकात ५५० रुपये प्रतिक्विंटलने शासनाने कांदा खरेदी केला. ज्वारीला २३०० रुपये, भाताला १५५० रुपये, सुपारीला २७००० रुपये प्रतिक्विंटलचा दर कर्नाटकात मिळतो आहे. आयात-निर्यात धोरण केंद्राच्या हाती असल्याने शेतमालाच्या दराच्यासंदर्भात निर्णय घेताना राज्यांवर मोठा दबाव येतो. प्रत्येक राज्याची पिके, त्यांचा काळ वेगवेगळा आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून आधारभूत किमती जाहीर केल्यानंतर त्या प्रत्येक राज्यातील शेतकऱ्यांना लाभकारक ठरतीलच असे नाही. त्यामुळे आपल्या प्रत्येक राज्याला त्यांच्या पीकनिहाय आधारभूत किमती जाहीर करण्याचा कालावधी जाहीर करण्याची मुभा असणे आवश्यक आहे. मुळात केंद्र सरकारकडून सर्व राज्यांकडील उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाच्या किमती आल्यानंतर केंद्र स्तरावरून सरासरी वा सुचविलेल्या दरांचा फारसा विचार न करता आधारभूत किमतीबाबत घेतले जाणारे निर्णयच शेतमालाला योग्य दर मिळण्यातील मोठा अडथळा आहेत. केलेल्या सर्वंकष प्रयत्नांचे फलित म्हणून देशात कस्टम हायरिंग सेंटरची संकल्पना पुढे आली आहे.



> “ शासनाने आपल्या योजनांची अंमलबजावणी शेतकरी केंद्रस्थानी ठरवून केल्यास शेतीमालाचे दर व शेतकऱ्यांचे सर्व महत्त्वाचे प्रश्न तत्काळ निकाली निघू शकतात. त्या दिशेने शासनाला आपल्यामार्फत जे काही सुचविता येईल ते सुचविण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न आहे.
>
> –डॉ. टी. एन. प्रकाश कामार्डी,
> अध्यक्ष, कर्नाटक कृषिमूल्य आयोग

शेतमालाची आधारभूत किमत जाहीर होत असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना ती किमत मिळत नाही. शेतकऱ्यांना मिळणारे दाम, बाजार समित्यांमधील ठोक किंमत व प्रत्यक्ष ग्राहकांच्या हाती पडताना असलेले दर यामध्ये प्रचंड तफावत आहे. हे अंतर कमी कसे करता येईल याअनुषंगाने बाजार समिती कायदा, अन्नसुरक्षा कायदा, जीवनावष्यक वस्तू कायदा याच्या सर्वंकष अभ्यासातून तोडगा काढण्याचे काम सुरू आहे, असे डॉ. प्रकाश यांनी स्पष्ट केले.